**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १९/२०१६-१७/१५९ दिनांक: ०६-१०-२०१६

**आदेश**

**आदेश केस क्र. १९/२०१६-२०१७**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. रामचंद्र महादेव भोसले :<br>मु. पो. डोंगरसोनी<br>ता. तासगांव, जिल्हा. सांगली | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली. | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>सांगली ग्रामिण विभाग | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग सावळज | |

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहे.

१) तक्रारदार श्री रामचंद्र महादेव भोसले रा. डोंगरसोनी ता. तासगाव. जि. सांगली यांचे गा-हाणे असे आहे की, त्यांनी त्यांच्या गट क्र. ७६८ या जमिनीमध्ये कृषी पंपासाठी नविन वीज पुरवठा मिळणेसाठी वितरण कंपनीकडे रितसर अर्ज करुन दिनांक २७-१०-२०१४ रोजी रक्कम रु.६१००/- जमा केले होते. त्यांनी सर्व कागदपत्रे सुध्दा वि.प. यांना सादर केली होती. परंतु त्यांना वीज जोडणी मिळाली नाही. त्यामुळे त्यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष सांगली यांचेकडे दिनांक ०४-०५-२०१६ रोजी तक्रार दाखल केली. सदर कक्षाने दिनांक ०२-०७-२०१६ रोजी आदेश करुन, तक्रारदार यांना जेष्ठता यादीप्रमाणे वीज जोडणी देण्यात येईल असे कळविले. त्या आदेशावर नाराज होऊन तक्रारदार यांनी या मंचाकडे दिनांक १९-०८-२०१६ रोजी अपिल दाखल केले आहे.

२) वितरण कंपनीतर्फे लेखी निवेदन सादर करणेत आले असून त्यानी असे कथन केले आहे की, तक्रारदार यांना नविन वीज जोडणी देण्यासाठी ०-१२ कि.मी.ची लघुदाब वाहिनी उभारणी करावी लागणार आहे. सध्या शलाका इन्फ्रास्ट्रक्चरतर्फे दिनांक ३१-०३-२०१३ अखेरची प्रलंबित कामे चालू आहेत. दुसरी कोणतीही एजन्सी उपलब्ध नाही. तक्रारदार हे माजी सैनिक नसून त्यांचा मुलगा लष्करात आहे. माजी सैनिकाना प्राधान्याने वीज जोडणी द्यावी असे परीपत्रक आहे. वि.प. यांचे अखेर असे कथन आहे की, तक्रारदार यांना प्रतिक्षायादीप्रमाणे वीज जोडणी देता येईल.

३) या प्रकरणाची सुनावणी दि. ०५-१०-२०१६ रोजी नेमण्यात आली होती. त्या दिवशी तक्रारदार स्वतः हजर होते व त्यांचे तोंडी निवेदन मंचाने ऐकले. वि.पं. तर्फे श्री ठाकूर अतिरिक्त कार्यकारी अभियंता आणि श्री दिक्षीत उपकार्यकारी अभियंता हजर होते व त्यांचा युक्तिवाद ऐकणेत आला. सर्व उपलब्ध कागदपत्रांचे वाचन करण्यात आले आहे.

४) तक्रारदार यांचे म्हणणे की त्यांचा मुलगा लष्करात नोकरीस असून त्यांना प्राधान्याने वीज जोडणी मिळणे आवश्यक आहे. त्यांनी सांगितले की, वीज जोडणी न मिळाल्यामुळे त्यांचे नुकसान झाले असून त्यांना नुकसान भरपाई देणेत यावी.

वि.प. तर्फे असे सांगण्यात आले की, सन-२०१४-१५ च्या प्रतिक्षा यादीप्रमाणे तक्रारदार यांचा ३७ वा क्रमांक असून सन-२०१६ मध्ये त्यांचा २५५ क्रमांक सदर यादीत आहे. प्रतिक्षा यादी सन-२०१० पासूनची प्रलंबित आहे. त्यांनी कथन केले की, नियमानुसार तक्रारदार यांना वीज जोडणी देणेत येईल.

५) या मंचाच्या निर्णयासाठी खलील मुद्दे उपस्थित होत आहेत.

(१) तक्रारदार यांची वीज जोडणी मिळणेबद्दलची विनंती मान्य करता येईल काय?

उत्तरः- होय.

(२) तक्रारदार यांची सुनावणीच्या वेळी केलेली नुकसान भरपाई मिळणेची मागणी स्विकारार्ह आहे काय?

उत्तरः- नाही.

(३) कोणता अंतिम आदेश?

उत्तर :- शेवटी नमूद केल्याप्रमाणे

## कारणमिमांसा

६) तक्रारदार यांनी वितरण कंपनीकडे सन-२०१४ मध्ये नविन वीज जोडणी त्यांच्या गट क्र.७६८ मध्ये मिळणेसाठी अर्ज करुन दिनांक २७-१०-२०१४ रोजी रक्कम रु. ६१००/- जमा केली याबद्दल वाद नाही, त्यांचा ग्राहक क्र. २८२२८०००४५७१/७ असा आहे असे वि. प. यांनी लेखी निवेदनात नमूद केले आहे. तक्रारदार हे माजी सैनिक नसून त्यांचा मुलगा भारतीय लष्कराच्या सेवेत आहे. याबद्दलही वाद नाही. माजी सैनिकाना प्राधान्याने वीज जोडणी द्यावी असे परिपत्रक असल्याचे सांगणेत आले. सन-२०१४ च्या प्रतिक्षायादीत तक्रारदार यांचा ३७ वा क्रमांक असलेचे श्री दिक्षीत व श्री ठाकूर यांनी सांगितले. तसेच सन-२०१६ च्या जेष्ठता यादीतील क्रमांक २५५ असा आहे असेही सांगितले.

७) तक्रारदार यांनी नविन वीज जोडणीची रक्कम जमा करुन जवळजवळ दोन वर्षे होत आली आहे. अद्याप त्यांना वीज पुरवठा शेतीसाठी मिळालेला नाही ही बाब स्पष्ट आहे. तक्रारदार यांचा मुलगा भारतीय लष्करात कार्यरत आहे ही गोष्ट दुर्लक्षित करता येण्यासारखी नाही. सर्व कागदपत्रांची पूर्तता त्यांनी केली असावी असे वाटते.

८) मौजे दहिवडी येथील गट क्र. ७६८ ही जमिन तक्रारदार यांची असलेचे दिसते. त्यामध्ये त्यांनी नविन वीज जोडणी मागितली आहे. परंतु वि.पं. यांचे पत्रव्यवहारातील काही कागदपत्रांत गट क्र. १७६८ असा उल्लेख झालेचे दिसते. तक्रारदार यांना ०.१२ कि.मी.ची लघुदाब विद्युत वाहिनी वीज जोडणी देणेसाठी उभारावी लागेल असे दिसून येते. तक्रारदार यांचे चिरंजीव यांनीही लष्करातून लौकर वीज जोडणी मिळणेबद्दल विनंती पत्र वि.प.यांना पाठवलेचे दिसून येते.

९) तथापि कृतिमानके विनियम २०१४ मधील तरतूदीनुसार तक्रारदार यांना तीन महिन्यात वीज जोडणी मिळाली नाही हे स्पष्ट आहे. सदर विनियमातील तरतूदीमध्ये बदल, दुरुस्ती वगैरे करण्याचे अधिकार नियम १४.१ नुसार फक्त विद्युत नियामक आयोगाला आहेत. तसेच कृतिमानके विनियमातील तरतूदी अंमलात आणताना कोणतीही अडचण येत असेल तर त्यांचे निवारण करण्याचे अधिकार सुध्दा मा. आयोगास नियम १५.१ नुसार दिले आहेत.

१०) वरीलप्रमाणे तक्रारदार यांना नविन वीज जोडणी मिळणेबद्दल आदेश करणे योग्य होत आहे. तथापि त्यांनी त्यांच्या मंचा पुढील तक्रार अर्जात कोणत्याही प्रकारची भरपाई मागितली नाही. त्यांनी या मंचासमोर, दोन वर्षात शेतीचे झालेल्या नुकसानीबाबत नुकसान भरपाई मिळणेची तोंडी मागणी केली, परंतु त्याबाबतचा कोणताही तपशील उपलब्ध केला नाही. त्यामुळे मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवणेत येत आहे.

११) उपरोक्त परिस्थितीत, खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येतो.

**आदेश**

१) तक्रारदार श्री रामचंद्र महादेव भोसले, मु.पो. डोंगरसोनी ता. तासगांव जि. सांगली यांना तीन महिन्यामध्ये त्यांच्या मागणीनुसार नविन वीज जोडणी देणेत यावी असा वि.प. यांना आदेश देणेत येतो.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |